## वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी
## माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश अधिसुचना

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाकरीता माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी इयत्ता ९ वी उत्तीर्ण उमेदवाराकडून विहीत नमुन्यात दिनांक **०४-०७-२०२२ ते ०५-०८-२०२२** पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. प्रवेश अर्ज व माहिती पुस्तिका प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, परभणी व औरंगाबाद येथे सशुल्क उपलब्ध आहेत. (रू.४००/- खुला प्रवर्ग, रू.२००/- मागासप्रवर्ग).

संपूर्ण भरलेला अर्ज विहीत प्रमाणपत्रांच्या प्रतिसह वरील नमूद केलेल्या विद्यालयात दिनांक **०५-०८-२०२२** पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९ ते १.३० व दुपारी २ ते ५.३० वाजेपर्यंत) स्विकारण्यात येतील. अपूर्ण अर्जांचा विचार केला जाणार नाही. प्रवेश कार्यक्रम तसेच अर्जासोबत जोडावयाची आवश्यक प्रमाणपत्रे व प्रवेशाबाबतची माहिती, प्रवेश माहिती पुस्तीकेत नमुद करण्यात आली आहेत.

सदर प्रवेश अधिसुचना विद्यापीठ संकेतस्थळ www.vnmkv.ac.in वर पाहता येईल.

28/6/22

कुलसचिव
वसंतराव नाईक मराठवाडा
कृषि विद्यापीठ, परभणी

क्रमांकः
दिनांक. २८/०६/२०२२

D/lower sec/Bec...

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी**
**माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेश अधिसुचना**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र **( Gardner's Training Certificate Course )** या एक वर्ष कालावधीच्या २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश देण्यासाठी इयत्ता ९ वी उत्तीर्ण उमेदवारांकडून विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रवेश अर्ज आणि माहिती पुस्तीका प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय,परभणी व कृषि तंत्र विद्यालय,पैठण रोड, औरंगाबाद यांचे कार्यालयातून खुल्या प्रवर्गासाठी रु.४००/- व मागासवर्गीयांसाठी रु.२००/- रोखीने सुट्टीचे दिवस वगळुन दि.०४-०७-२०२२ ते दि.०५-०८-२०२२ या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळु शकतील किंवा प्रवेश अर्ज टपालाने पाहिजे असल्यास खुल्या प्रवर्गासाठी रु.४००/- व मागासवर्गीयांसाठी रु.२००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा परभणी येथे देय असलेला धनाकर्ष (Demand Draft) नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी यांच्या नांवे व स्वतःचा संपूर्ण पत्ता असलेला लिफाफा रु.४०/- च्या टपाल हाशीलासह पाठविल्यास मिळु शकेल.

या अभ्यासक्रमा करीता वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रांतर्गत मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील रहिवासी उमेदवार पात्र असतील. मागासवर्गीय उमेदवारांचे प्रवेश अर्ज प्राप्त करण्यासाठी मागासवर्गीय असल्या बाबतचे प्रमाणपत्र दाखविणे आवश्यक आहे. तसेच डिटी (ए), एनटी (ब), (क), (ड), इतर मागासवर्ग, ई.डब्ल्यू.एस व विशेष मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना दिनांक ०१-०४-२०२२ नंतर निर्गमित केलेले अ-उन्नत गट प्रमाणपत्राची फोटो प्रत प्रवेश अर्ज विकत घेतांना सादर करणे आवश्यक आहे.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रमाची सुविधा खालील ठिकाणी उपलब्ध आहे.

१. कृषि तंत्र विद्यालय, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी (अनुदानीत)- **प्रवेश क्षमताः** ४० विद्यार्थी
२. कृषि तंत्र विद्यालय,पैठण रोड, औरंगाबाद (विनाअनुदानीत) - **प्रवेश क्षमताः** ४० विद्यार्थी

अर्जासोबत इयत्ता ९ वी परिक्षा उत्तीर्ण असल्याचे गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला किंवा अर्ज सादर करण्यापुर्वी एखाद्या संस्थेत प्रवेश घेतला असेल अशा संस्थेचे बोनाफाईड प्रमाणपत्राच्या व माहिती पुस्तिकेत नमुद केल्या प्रमाणे इतर आवश्यक प्रमाणपत्रे / कागदपत्रांच्या सत्यप्रति जोडणे आवश्यक राहील.

संपूर्ण भरलेले अर्ज,विहित प्रमाणपत्राच्या प्रतिसह कृषि तंत्र विद्यालय, वनामकृवि**ए** परभणी व कृषि तंत्र विद्यालय, पैठण रोड, औरंगाबाद येथे दिनांक ०५-०८-२०२२ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सकाळी ९ ते १.३० व दुपारी २ ते ५.३०) वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

तात्पुर्ती तसेच सुधारीत गुणवत्ता यादी घटक कृषि तंत्र विद्यालय,परभणी व कृषि तंत्र विद्यालय,पैठण रोड, औरंगाबाद येथे माहिती पुस्तिकेत नमुद केलेल्या दिनांकास लावण्यात यईल. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया माहिती पुस्तीकेतील प्रवेश कार्यक्रमा प्रमाणे अमलात येईल.

निवडी बाबतची माहिती पत्राद्वारे कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. प्रवेश गुणवत्ता व शासनाच्या आरक्षण नियमा नुसार केला जाईल. अपूर्ण, तसेच विहीत ताराखेनंतर आलेले प्रवेश अर्ज विचारात घेतले जाणार नाही. प्रवेश अर्ज व माहिती पुस्तीकेत इतर आवश्यक माहिती देण्यात आलेली आहे. ती काळजीपूर्वक वाचुन त्या प्रमाणे अर्ज व प्रमाणपत्र सादर करावे. **टपाल विलंबास विद्यापीठ जबाबदार रहाणार नाही**. सदरची प्रवेश अधिसुचना विद्यापीठ संकेतस्थळ www.vnmkv.ac.in वर ही पाहता येईल.

क्रमांकः
दिनांक. / /

कुलसचिव
वसंतराव नाईक मराठवाडा
कृषि विद्यापीठ, परभणी

D/lower sec/Bac...

माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम केंद्र, कृषि तंत्र विद्यालय, परभणी / कृषि तंत्र विद्यालय, पैठण रोड, औरंगाबाद येथील सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाचा प्रवेश कार्यक्रम.

| अ.क्र. | प्रवेश कार्यक्रमाचा तपशील | दिनदर्शिकेनुसार |
|---|---|---|
| १ | अर्ज विक्री सुरूवात दिनांक | ०४-०७.२०२२ |
| २ | अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक | ०५.०८.२०२२ |
| ३ | तात्पूरती गुणवत्ता यादी लावण्याचा दिनांक | १२.०८.२०२२ |
| ४ | गुणवत्ता यादी संबधी तक्रार अर्ज स्विकृती करण्याचा अंतिम दिनांक | १९.०८.२०२२ |
| ५ | तक्रार निवारण समितीची बैठक दिनांक | २३.०८.२०२२ |
| ६ | सुधारीत गुणवत्ता यादी लावण्याचा दिनांक | २५.०८.२०२२ |
| ७ | गुणवत्ता यादी प्रमाणे प्रवेश व जागा रिक्त राहील्यास संवर्ग बदलून प्रवेशाचा दिनांक | २९.०८.२०२२ |
| ८ | परभणी / औरंगाबाद येथे जागा रिक्त राहील्यास परभणी व औरंगाबाद येथील गुणवत्ता यादीतील प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी गुणानुक्रमे स्थळ प्रवेश फेरीची संधी (Spot admission) | ३०.८.२०२२ |
| ९ | शैक्षणिक वर्षाची सुरूवात दिनांक | ०७.०९.२०२२ |

विशेष सुचनाः

१. **दिनांक २९.०८.२०२२** रोजी सकाळी ९.०० ते १.०० वाजेपर्यंत संबधीत कृषि तंत्र विद्यालयात परभणी / औरंगाबाद येथे प्रवेश पात्र उमेदवारांनी प्रवेश अर्जा सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांच्या मुळ प्रतिसह संपूर्ण शुल्कासह हजर रहावे व **कार्यालयात हजर झाल्याची नोंद करावी**. विहित कालावधीत नोंदणी झालेल्या उमेदवारांची प्रवेश प्रक्रिया दुपारी २.०० वाजता चालु होईल त्यावेळी शुल्क व मुळ प्रमाणपत्रासह उपस्थित विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे व शासन नियमाप्रमाणे प्रवेश देण्यात येईल. दुपारी १.०० नंतर विलंबाने नोंद करणारे उमेदवार विहीत वेळेत नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशा नंतर जागा रिक्त राहील्यास गुणानुक्रमे रिक्त जागांवर प्रवेशास पात्र असतील.

२. स्थळ प्रवेश (Spot admission) फेरीची संधी-परभणी/औरंगाबाद येथे जागा रिक्त राहील्यास परभणी व औरंगाबाद येथील गुणवत्ता यादीतील प्रवेश न घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी गुणानुक्रमे स्थळ प्रवेश फेरी ( Spot admission ) **दिनांक** ३०.०८.२०२२ रोजी आयोजीत करण्यात येईल. यासाठी सकाळी ९.०० ते १.०० वाजेपर्यंत कृषि तंत्र विद्यालय, औरंगाबाद येथे प्रवेश पात्र उमेदवारांनी प्रवेश अर्जा सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांच्या मुळ प्रतिसह संपूर्ण शुल्कासह हजर रहावे. **कार्यालयात हजर झाल्याची नोंद करावी**. विहित कालावधीत नोंदणी झालेल्या उमेदवारांची प्रवेश प्रक्रिया दुपारी २.०० वाजता चालु होईल त्यावेळी शुल्क व मुळ प्रमाणपत्रासह उपस्थित विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे व शासन नियमाप्रमाणे प्रवेश देण्यात येईल. दुपारी १.०० नंतर विलंबाने नोंद करणारे उमेदवार विहीत वेळेत नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशा नंतर जागा रिक्त राहील्यास गुणानुक्रमे रिक्त जागांवर प्रवेशास पात्र असतील.

टिपः

१. काही अपरिहार्य कारणामुळे वरील कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

२. सुधारित गुणवत्ता यादी प्रमाणे उमेदवारांनी प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, परभणी व प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, पैठण रोड, औरंगाबाद कार्यालयात प्रवेशासाठी उपस्थित राहावे.